म.ज.म. अधिनियम, १९६६ चे कलम ११७
अंतर्गत शैक्षणिक अथवा इतर प्रयोजनार्थ अकृषिक
आकारणी माफीबद्दल कायदेशीर
तरतूद.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांक विपअा ९९८६/सीआर ४८९/ल-२
दिनांक : १८ मार्च १९८७.

परिपत्रक

शैक्षणिक संस्थानी शैक्षणिक प्रयोजनार्थ जागेचा वापर केला तर सदरहू संस्थांना म.ज.म.अधिनियम, १९६६ चे कलम ११७ अंतर्गत अकृषिक आकारणीची माफी मिळते. अधिनियमामध्ये तशी वैधानिक तरतूद असल्याने वेगळे आदेश काढण्याची गरज नाही. उपरोक्त वैधानिक तरतूद स्पष्ट असतानाही तहसिलदार मलकापूर जिल्हा बुलढाणा यांनी तरतुदीचे उल्लंघन करून सन १९८२ मध्ये एका शैक्षणिक संस्थेकडून अकृषिक आकारणी वसूल केली आणि संस्थेला सन १९८६ पर्यंत परत करण्याची कार्यवाही केली नाही असे आढळले. त्यामुळे माननीय सदस्यांनी त्या प्रकरणामध्ये सन १९८६ चे दुसरे अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न विचारला होता. सदरहू प्रश्नाविषयी विधानमंडळामध्ये चर्चा झाली त्यावेळी सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने माननीय महसूल मंत्री यांनी सभागृहाला कांही आश्वासने दिली. सदरहू आश्वासनाबाबतची पूर्तता स्थानिक कार्यालयाकडील माहिती अभावी योग्य प्रकारे व योग्य मुदतीमध्ये शासनाला करता आली नाही. उपरोक्त परिस्थितीमध्ये आश्वासन समितीचे बैठकीसमोर सचिव [महसूल] यांना दि.१९/२/८७ रोजी साक्षीसाठी बोलाविले होते. आश्वासन समितीचे बैठकीमध्ये सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने असे ठरले की सर्व महसूली अधिकारी यांना शैक्षणिक संस्थांना अकृषिक आकारणीमधून माफी मिळते अशा सूचना देण्यात याव्यात. तरी सर्व महसूल अधिकारी यांचे लक्ष शासनपत्र क्रमांक एलएनए ३४७२/११४४७/सी-२ दि.२९/५/७२ [ सोबत प्रत ] आदेशातील सूचनाकडे पुन्हा वेधण्यात येत आहे. सर्व महसूली अधिकारी ह्यांनी म.ज.म. अधिनियम, १९६६ चे कलम ११७ मधील वैधानिक तरतूदींचे यथायोग्य व दक्षतापूर्वक पालन करण्याची खबरदारी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

कक्ष अधिकारी,

R. W. S. O. file